प्रबोधिनीचे संस्थापक



कै. आप्पा पेंडसे



'मातृभूमि हे दैवत येथे स्थापियले पूजियले'

प्रबोधिनीचे स्फूर्तिदाते



स्वामी विवेकानंद

# ज्ञान प्रबोधिनी

**देशातील संस्थाजीवन समृद्ध करणारी संघटना**

# सेतुबंधन मेळावा

सौर माघ १०, शके १९३१, ३० जानेवारी २०१०

## ज्ञान प्रबोधिनी : प्रमुख संकल्पना

✻ **तत्त्वसप्तक** : धर्मसंस्थापना (म्हणजेच समाजसंस्थापना), हिंदु जीवनदृष्टी, जनी जनार्दन संघटना, विकास, उत्तमता, विज्ञानाभिमुखता (संदर्भ : ज्ञान प्रबोधिनी खंड ३)

✻ **भवितव्य लेख** (१९९४ ते २०१४) : **५ उद्दिष्टप्रधान दिशा ( = संघटन प्रभाग)**

१. नेतृत्वविकसन   २. राष्ट्रीय एकात्मता   ३. स्त्री शक्ती प्रबोधन
४. कार्यविस्तार   ५. कार्यकर्ता प्रशिक्षण

**५ कार्यप्रधान दिशा ( = ५ प्रभाग)**

१. शिक्षण   २. ग्राम विकसन   ३. संशोधन
४. आरोग्य   ५. आर्थिक स्वयंपूर्णता/मध्यवर्ती व्यवस्थापन

✻ **व्यवच्छेदक कार्यवैशिष्ट्ये** : १. समग्रता   २. सहविचार   ३. सर्जनशीलता   ४. स्वावलंबन

✻ **नवीन उपक्रमाच्या विस्ताराचे ७ टप्पे** : १. चिंतन गट   २. अभ्यास गट   ३. पथदर्शक प्रकल्प   ४. सैद्धांतीकरण   ५. रचनाबद्ध विभाग   ६. समकार्यी साखळी   ७. लोक चळवळ

✻ **चार पथकाधिपती** : १. समर्थ रामदास   २. स्वामी विवेकानंद   ३. स्वामी दयानंद   ४. योगी अरविंद

✻ **चार प्रतिज्ञा** : **प्रथम** – राष्ट्रसेवेसाठी प्रासंगिक वेळ   **द्वितीय** – प्रबोधिनीच्या माध्यमातून राष्ट्रसेवा
**तृतीय** – पूर्णवेळ व उत्तरदायी प्रबोधक   **चतुर्थ** – पूर्णवेळ वैराग्यपूर्वक प्रबोधक.

# केंद्रशः माहिती

## ❖ पुणे केंद्र

### १. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

- बुद्धिमान विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी चालवलेली शाळा.
- विद्यार्थ्यांना त्यांच्या बुद्धीच्या अप्रकट क्षमता दाखवण्यास वाव मिळावा अशी भूमिका. यासाठी प्रशालेत स्वतंत्र शिक्षणक्रमाची निर्मिती.
- विविध प्रकल्प, परिस्थिती ज्ञान तासिका, अभिव्यक्ती तासिका, तंबूशिबिर यांतून मुलांच्या विचार कौशल्यांचा व सामाजिक जाणिवांचा विकास करण्याची प्रक्रिया.

### २. स्पर्धा परीक्षा केंद्र

- स्वच्छ, कार्यक्षम, मूल्याधिष्ठीत अधिकारी प्रशासन सेवेत जावेत म्हणून १९९५ साली केंद्राची सुरुवात.
- राज्य लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पूर्व, मुख्य, मुलाखत परीक्षांना संपूर्ण मार्गदर्शनाची सोय.
- सामाजिक वृत्तीघडणीसाठी ग्रामभेटी, विविध विकास प्रकल्प भेटी व जिल्हा अभ्यास दौरे.
- 'संवाद' या पत्रिकेद्वारा विद्यार्थी-अधिकारी संपर्क, भेटी, मेळावे, अनौपचारिक गप्पा इ. मधून नेटवर्कींगचा प्रयत्न.
- आजपर्यंत राज्य लोकसेवा आयोगातून ५०० व केंद्रीय लोकसेवा आयोगातून १५६ अधिकाऱ्यांची निवड.
- चार देश, भारतातील सर्व राज्ये, महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांमध्ये आपले विद्यार्थी अधिकारी कार्यरत.

### ३. छात्र प्रबोधन

- ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी मासिक. महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, गुजराथ राज्यात मिळून सुमारे ३५ शहरे व १०० गावांमध्ये मिळून ४०,००० वाचक. ११० वितरण केंद्रांवर ३०० स्वयंसेवी कार्यकर्ते.
- छात्र प्रबोधन मासिकाचे महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर २८०० सदस्य, सलग १४ वर्षे उत्कृष्ट मासिक पुरस्कार
- विविध सहा दिवाळी विशेषांक व वैशिष्ट्यपूर्ण असा ब्रेललिपीमधील अंक.
- सभासदांसाठी विविधांगी उपक्रम, स्पर्धा. स्थानिक उपक्रम केंद्रांची उभारणी.
- छात्र प्रबोधनतर्फे एकूण ५१ मराठी पुस्तके व ५ इंग्रजी पुस्तकांचे प्रकाशन.
- मैत्री अभियानांतर्गत ईशान्य भारत (२००५) व काश्मिर अभ्यासदौरा (२००७)

### ४. संवादिनी

- स्वयंविकासातून समाजपरिवर्तनाचे काम करू इच्छिणाऱ्या कृतिशील महिलांचा गट.
- मासिक बैठक. पालवी, गप्पाकट्टा, संस्थाभेट, अभ्यासदौरे इ. उपक्रम.
- समानतेचे, समृद्धीचे, संतुलित समाजाचे चित्र कसे रेखाटता येईल यांवरील चिंतन म्हणून 'समतोल' द्वैमासिक.
- 'उमलत्या वयाशी जुळवून घेताना...' : सुमारे २५००० मुलांपर्यंत पोहोचलेला उपक्रम व ३०० + प्रौढ सदस्यांना प्रशिक्षक प्रशिक्षण.

### ५. प्रज्ञा मानस संशोधिका

- मानसशास्त्रातील विद्यावाचस्पती पदवीसाठी संशोधन. पुणे विद्यापीठाची मान्यता.
- शालेय मानसशास्त्र या विषयातील पदव्युत्तर पदविका वर्ग व अन्य प्रशिक्षण वर्ग.
- औद्योगिक संस्थांमध्ये प्रशिक्षण वर्ग.
- विविध क्षमतांचे मापन, संवर्धन व मार्गदर्शन.

### ६. संत्रिका

- पदव्युत्तर संशोधन केंद्र म्हणून पुणे विद्यापीठाची स्थायी मान्यता.
- धर्मसंस्कार पोथ्या. देहदान, हिंदुकरण, सहस्रचंद्रदर्शन यांसारख्या नवीन संस्कारांची मांडणी.
- ८०० हस्तलिखिते व १४००० अभ्यासग्रंथांचा संग्रह उपलब्ध, ४० ध्वनिफितींमध्ये ऋग्वेद उपलब्ध.
- ३६ भाषांमधील व १९ लिप्यांमधील १९५० रामायण ग्रंथांचा अपूर्व संग्रह.
- जनतंत्र उद्‌बोधन मंच (राष्ट्रवाद अभ्यास मंडळ).

### ७. ग्रामविकसन

- पाणी, शिक्षण, ऊर्जा, रोजगारनिर्मिती, कृषी, आरोग्य अशा विविध क्षेत्रांत काम.
- लोकसहभागातून पाणी व्यवस्थापनासाठी पाणलोट क्षेत्र विकास.
- आधुनिक तंत्रज्ञानाचा ग्रामीण विकासात वापर करून शिवगंगा-गुंजवणी खोऱ्यात ५० गावांत काम.
- ग्रामीण प्रज्ञा विकास योजना व किशोरी विकास योजना यांद्वारे ग्रामीण शालेय विद्यार्थ्यांमध्ये वृत्तीघडण.
- मावळ तालुक्यात सेंद्रीय शेतीचा प्रसार, २८ पॉलीहाऊसेसची उभारणी व त्यासंबंधी शेतकऱ्यांना प्रशिक्षण
- ग्रामीण महिलांनी एकत्र येऊन तीन तालुक्यातील ३६ गावांत २८२ बचत गट स्थापन. सुमारे ५,००० महिला त्याद्वारे जोडल्या गेल्या आहेत. 'जिजामाता प्रबोधन केंद्र' ही ग्रामीण महिलांची स्वायत्त संस्था स्थापन.
- ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्ट व माजी विद्यार्थी यांच्याद्वारे ग्रामीण माता व बालके यांच्यासाठी २० गावांत आरोग्य प्रकल्प. आरोग्य तपासणी - ५०० महिला लाभार्थी.

### ८. युवक-युवती विभाग

- ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील व अन्य शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींची क्रीडादले, विज्ञानदले.
- साहस सहली, अभ्यास दौरे, तंबू शिबिरे, क्रीडा प्रात्यक्षिके, गणेशोत्सवातील विविध प्रकारच्या प्रात्यक्षिकांसह मिरवणुकीतील सहभाग, अभ्यास शिबिरे, पालखी अशा अनेक माध्यमांतून युवक-युवती संघटन.

## ❖ ज्ञान प्रबोधिनी, शिवप्रदेश

- कृषी तांत्रिक विद्यालय, शिवापूर : २००६ पासून नवे प्रशिक्षण वर्ग सुरू.
- संगणकीकृत स्वयंचलित यंत्र (C.N.C) वर्ग, व्हर्टिकल मशिनिंग सेंटर.
- महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण मंडळाने मान्य केलेले पाच नित्य अभ्यासक्रम.

## ❖ नवनगर विद्यालय, निगडी

- पूर्व प्राथमिक ते शालांत परीक्षेपर्यंतचे मराठी व इंग्रजी माध्यमातील २,५७७ विद्यार्थ्यांचे विद्यालय.
- इ. ५ वी ते १० वी विद्यार्थ्यांसाठी तंत्रशिक्षण अभ्यास यामध्ये तारतंत्री व विजाणू जोडारी, संधाता, नळजोडणी, सुतारकाम, शिवण व संगणक इ. विषयांचे प्रशिक्षण
- भारतीय शिक्षण प्रणालीच्या मांडणीचा प्रयोग 'गुरुकुल', पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांसाठी १२ तासांची शाळा.
- मुलांची विविध खेळांतील बुद्धिमत्ता ओळखून त्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याच्या उद्देशाने सुरू केलेला उपक्रम 'क्रीडाकुल'.

## ❖ ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे

- मावळ तालुक्यातील एक अग्रगण्य माध्यमिक विद्यालय.
- विद्याव्रत संस्काराचा मावळ तालुक्यातील ५० शाळांत प्रसार.
- ग्रामीण तंत्रज्ञान केंद्र, प्रयोगशाळा अन्य शाळांतील विद्यार्थ्यांना उपलब्ध.
- आदर्श गाव योजना, पवनामाईचा उत्सव इ. समाज चळवळीचे उपक्रम.

## ❖ ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर

- शिशु वर्ग ते इ. दहावीपर्यंतची मराठी माध्यम शाळा.
- शिशु अध्यापिका विद्यालय. शिशुशिक्षकांचे विभागीय (तीन जिल्हे) अधिवेशन (२००६).

- २०-२५ विविध संप्रदायांच्या साधकांचा सहभाग असणारे सत्संग केंद्र.
- विविध वसाहतींमधून श्रीसुक्त व सप्तशती वर्गाचे प्रतिवर्षी आयोजन.
- स्त्री संघटनाकरिता संवादिनी व महिला बचतगट प्रशिक्षण वर्ग.
- बालविकास केंद्रे, बालविज्ञान परिषद, बाल विकास वक्तृत्व स्पर्धा
- ग्रामीण प्रज्ञा विकसन, पौरोहित्य शिबिरांचे आयोजन.

## ❖ हराळी केंद्र

- भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी शिक्षणाचा शेतीनिष्ठ प्रयोग.
- १९९५ ला प्राथमिक व माध्यमिक विद्यालय सुरू. एकूण ३३० विद्यार्थी.
- २००६ मध्ये १५० गावांमधील २७५ विद्यार्थ्यांचे गुरुकुल.
- आर्थिक स्वावलंबनासाठी सुमारे ५० एकर जमिनीवर ७,००० फळझाडांची लागवड.
- मराठवाडा कृषी विद्यापीठाचा 'कृषीतंत्र पदविका' अभ्यासक्रम जून २००६ मध्ये सुरू.
- संगणक केंद्र, बाजार माहिती केंद्र, बचत गट, फळप्रक्रिया उद्योग अशा विविध दिशांनी प्रकल्पाचा विस्तार.
- २००६ मध्ये शासनाकडून 'वृक्षमित्र' पुरस्कार देऊन सन्मानित.

### ♦ अंबाजोगाई - विस्तार केंद्र

- दि. १६ मार्च १९९९ पासून प्रारंभ, २००९ पर्यंत विविध १२ उपक्रमांची सुरुवात.
- प्रबोधशाळा, ६ साप्ताहिक उपासना केंद्रे, ३ शिशूविहार केंद्रे, माँ शारदा गटांत ३० ते ३५ महिला, पुरुषांसाठी स्फूर्तीगट. ५ एकरावर विवेकवाडी शेती प्रकल्प.
- ३ शाळांमध्ये I.B.T प्रकल्पामध्ये समन्वयक म्हणून काम. एकूण ८८ ठिकाणी मातृभूमी पूजनाचे कार्यक्रम.

### ♦ डोंबिवली - विस्तार केंद्र

- १९९५ पासून सुरुवात.
- साप्ताहिक उपासना, किशोरी विकास प्रकल्प, पाच केंद्रांवर पौरोहित्य वर्ग. प्रबोधक मंडळ, साप्ताहिक विकासिका.
- युवक-युवती विभागाकडून विविध शिबिरे, अभ्यास मंडळ, अभ्यासदौऱ्यांचे आयोजन.
- युवक गटाने सुरू केलेला उपक्रम : इको क्लब.
- महिलांसाठी संवादिनी, गप्पाकट्टा, संस्था भेट.

### ♦ बोरिवली - विस्तार केंद्र

- १९९८ पासून सुरुवात.
- शालेय विद्यार्थ्यांसाठी साप्ताहिक विकासिका व विविध शिबिरांचे आयोजन, महिलांसाठी संवादिनी.
- दशकपूर्ती वर्षानिमित्त (२००७-०८) दहा वैविध्यपूर्ण कार्यक्रम संपन्न. उदा. शिक्षक-पालक कार्यशाळा, शैक्षणिक सहली, आरोग्य तपासणी इ.
- गेल्या तीन वर्षात दोन अभ्यास शिबिरे, जानेवारी २०१० मध्ये युवक गटासाठी 'भारत २०२०' कार्यक्रम संपन्न.

### ♦ सांगली - विस्तार केंद्र

- १९७८ सुरुवात, दल, गणेशोत्सव, विक्री उपक्रम, सहली इ. उपक्रम.
- २००८ पासून पूर्णवेळ कार्यकर्ता नियुक्त. सध्या युवकांचे नियमित दैनंदिन दल, दलाला जोडून शैक्षणिक उपक्रमांची साप्ताहिक प्रबोध शाळा. तसेच सायकल सहल, विविध शिबिरे, नाविन्यपूर्ण शैक्षणिक स्पर्धा (उदा. विज्ञान स्पर्धा, प्रकल्प स्पर्धा इ.) हे शालेय वयोगटासाठीचे प्रासंगिक उपक्रम.
- मातृभूमी पूजन, प्रेरणादायी व्याख्याने, महाविद्यालयीन आणि ज्येष्ठ वयोगटासाठी तसेच क्रियाशील सदस्यांसाठी नियमित साप्ताहिक उपासना आणि बैठक, प्रतिज्ञा ग्रहण समारंभ इ.

## ❖ ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यास

- संजीवन हॉस्पिटलचे व्यवस्थापन.
- शिरवळ येथील कमला मेहता नेत्र रुग्णालय.
- दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे व्यवस्थापन.
- नागरी वस्ती व ग्रामीण आरोग्य प्रकल्प.

## शालेय विद्यार्थी संख्या

| | विभाग → | पूर्व प्राथमिक | | प्राथमिक | | माध्यमिक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्रश: प्रशाला ↓ | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | एकूण |
| १. | पुणे | - | - | - | - | २३७ | २३८ | ४७५ |
| २. | निगडी | १३१ | १६० | ३८७ | ४१२ | ६७२ | ८१५ | २,५७७ |
| ३. | सोलापूर | ६४ | ८४ | १४२ | १८७ | २२६ | २९२ | ९९५ |
| ४. | हराळी | - | - | २७ | ७० | ६४ | १७० | ३३१ |
| ५. | साळुंब्रे | - | - | - | - | ८९ | १७५ | २६४ |
| | एकूण | ४३९ | | १२२५ | | २९७८ | | ४६४२ |

| अन्य वर्ग - प्रशिक्षणार्थी संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | स्पर्धा परीक्षा केंद्र | ५०० | ५. | सोलापूर (पौरोहित्य वर्ग) | ४६ |
| २. | प्रज्ञा मानस संशोधिका | ७३ | ६. | कृषितांत्रिक विद्यालय (शिवापूर) | २६ |
| ३. | संत्रिका, पुणे (पौरोहित्य वर्ग) | ५५ | ७. | कृषी पदविका विद्यालय (हराळी) | १०५ |
| ४. | शिशु अध्यापिका विद्यालय | ८० | | एकूण प्रशिक्षणार्थी संख्या | ८८५ |

# हिंदुस्थानच्या पुनर्जागरणाचा विचार मांडणारी
## ज्ञान प्रबोधिनीची काही प्रकाशने

### ❖ चरित्रात्मक पुस्तके :

१. राष्ट्रद्रष्टे विवेकानंद - वा. वि.वि. पेंडसे
२. विवेकानंद कन्या भगिनी निवेदिता - वा. वि. वि. पेंडसे
३. ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक वि. वि. पेंडसे - वा. स्वर्णलता भिशीकर

### ❖ चिंतनपर पुस्तके :

१. विवेकानंदांचा राष्ट्रधर्म - वा. वि. वि. पेंडसे
२. श्री अरविंद - श्रीमाताजी काय म्हणाले? - वा. वि. वि. पेंडसे
३. राष्ट्रदेवो भव - वा. वि. वि. पेंडसे
४. समर्थ रामदास काय म्हणाले? - वा. गिरीश बापट

### ❖ ज्ञान प्रबोधिनीचे खंड :

१. ज्ञान प्रबोधिनी खंड - १ (सध्या उपलब्ध नाही)
२. ज्ञान प्रबोधिनी खंड - २
३. ज्ञान प्रबोधिनी खंड - ३
४. ज्ञान प्रबोधिनी खंड - ४ (भाग १)

### ❖ ज्ञान प्रबोधिनीची संकेतस्थळे ❖

1. www.jnanaprabodhini.org
2. www.kreedakul.com
3. www.prashala.jnanaprabodhini.org
4. www.jppsychology.com
5. www.chhatraprabodhan.org

# ज्ञान प्रबोधिनी : गेल्या पाच वर्षांतील विस्तार संपर्क

## आंतरराष्ट्रीय संपर्क



• संपर्क व्यक्ति
* परिषदांमध्ये सहभाग
★ कार्यकर्त्यांचे दौरे
♦ स्पर्धा परीक्षा केंद्र विद्यार्थी अधिकारी
■ संत्रिका संस्कार विधी
⧈ देणगीदार व्यक्ती / संस्था

## देशांतर्गत संपर्क




☯ संगणक प्रशिक्षण केंद्रे
✷ युवा मैत्री शिबिरे




✡ स्थानिक शाळांमध्ये प्रशिक्षण वर्ग व युवा शिबिरे
◎ महाराष्ट्रातील २०० कार्यकर्त्यांचा अभ्यास दौरा



☯ मातृभूमी परिचय शिबिरे (निगडी)
✷ अभ्यास दौरे (युवक विभाग निगडी)
⌘ अभ्यास दौरे (छात्र प्रबोधन)
✡ अभ्यास दौरे (संवादिनी)
◎ अभ्यास दौरे (युवक विभाग पुणे)
▧ विशेष उपक्रम : अरुणाचल प्रदेश, आसाम
▨ विशेष उपक्रम : जम्मू व काश्मीर

# ज्ञान प्रबोधिनी - महाराष्ट्रातील विस्तार






# ''अशी वाढावी प्रबोधिनी''

*प्रबोधिनीचे अध्यक्ष डॉ. वसंतराव गोवारीकर यांच्या समवेत झालेल्या माजी विद्यार्थी मंडळाच्या सहचिंतन बैठकींमधील विचार (२००६ - ०७)*

- **संघटनात्मक विस्तारासाठी...**

१. प्रबोधिनीच्या तत्त्वज्ञानात उणीव नाही, परंतु प्रभावी व्यक्तिमत्त्व तयार करण्याच्या शास्त्रीय प्रक्रियेचा शोध घेऊन त्यावर काम करणे गरजेचे आहे.

२. दीर्घ कालीन अथवा लांब पल्ल्याच्या उद्दिष्टांपेक्षा नजीकच्या किंवा मध्यम पल्ल्याच्या उद्दिष्टांबाबत अधिक स्पष्टता आणण्याच्या उपयोग होईल.

३. सहविचारात्मक नेतृत्व पद्धती बुद्धिमान लोकांना अधिक चांगल्या पद्धतीने शिकविण्याचे नमुना तंत्र विकसित करावे.

४. देशप्रश्नांवरती व्यवहारातः शक्य व ठळक नजरेत भरण्याजोगी उत्तरे निर्माण करण्याचे कौशल्य शिकवावे.

५. विशिष्ट व्यक्तींऐवजी निश्चित प्रक्रियांवर आधारित नेतृत्व विकसन व्हायला हवे, जेणेकरून व्यक्ती बदलल्या तरी निश्चित प्रक्रियांद्वार नवीन नेतृत्व विकसित होऊ शकेल.

६. कार्यकर्त्यांच्या गरजा व त्यांच्या कौटुंबिक गरजा यांची सांगड बसवल्यास संघटना वाढण्यास/विस्तार होण्यास अधिक मदत होईल.

७. हिंतचिंतक व स्थानिक कार्यकर्त्यांच्या गरजा यांची सांगड घालणारे 'संपर्काधिकारी' तयार होणे गरजेचे आहे.

८. प्रबोधिनीच्या विस्तारासाठी देशभर ''बुद्धिमत्ता विकसन'' करणारी साधन केंद्रे (रिसोर्स सेंटर्स) उभी करावीत.

- **संस्थात्मक विस्तारासाठी...**

१. प्रबोधिनीत सतत नाविन्याचा आग्रह असतो. त्याचप्रमाणे एखाद्या हाती घेतलेल्या नवीन विषयावर सातत्याने १५-२० वर्षे काम केल्यानेच त्या कामाचा प्रभाव वाढेल. त्यामुळे, उपक्रमांच्या वाढीसाठी सातत्याची गरज आहे.

२. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात प्रबोधिनीचे एक शैक्षणिक केंद्र हवे, ज्याद्वारे प्रबोधिनी विविध शाळा व महाविद्यालयांची साखळी निर्माण करून समाजावर प्रभाव टाकू शकेल व हा प्रभाव तयार होण्यासाठी ''क्रिटिकल मास'' तयार होईल.

३. प्रबोधिनीच्या कार्यविस्तारासाठी त्या त्या ठिकाणचे स्थानिक कार्यकर्ते तयार होणे महत्त्वाचे आहे.

४. शिक्षण व मानसशास्त्र ही प्रबोधिनीची शक्तिस्थाने वापरून ग्रामीण शिक्षण व लोकांमध्ये जाणीव-जागृती याविषयी संशोधन व नमुना काम उभे करावे.

५. प्रबोधिनीचा महाराष्ट्राच्या एकंदरीत शिक्षण पद्धतीवर प्रभाव पडण्यासाठी प्रबोधिनी अधिक लोकाभिमुख कशी होईल याचा अधिक विचार करण्याची गरज आहे.

६. विविध संस्थांच्या कामाची बेरीज/गुणाकार व्हावा, यासाठी संपर्कजाळे (नेटवर्क) तयार करावे.

७. प्रसार माध्यमे व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास प्रबोधिनीच्या विचारांचा समाजात प्रसार व चांगली प्रतिमा निर्माण होण्यास मदत होईल.

**ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०, दूरभाष : ०२०-२४२०७०००**

( केवळ खाजगी वितरणासाठी ) ( सौर माघ १९३१/जाने. २०१०/४०० प्रती )